**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 6.831
Volume - 7, Issue - 05, May - 2024

DOIs:10.2018/SS/202405005 --:-- Research Paper / Article / Review

# डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कृषीविषयक कार्याचे ऐतिहासिक योगदान

**डॉ. माधुरी प्र. पाटील**
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख
एल. ए. डी. अँड श्रीमती आर. पी. कॉलेज फॉर वूमन, नागपूर.
mppatil.ngp@gmail.com

**सारांश:** डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख म्हणजे बहुआयामी तसेच प्रेरणादायी व्यक्तिमत्व. The Origin And Development of Religion In Vedic Literature या प्रबंधाच्या निमित्ताने त्यांनी धर्मग्रंथासंबंधी जे अध्ययन केले त्याचा परिणाम त्यांच्या विचारांवर झाला. स्वार्थी व भ्रामक विचारांचा बिमोड करून वैदिक संस्कृतीच्या मूल्यांची पुन्हा संस्थापना आणि जोपासना करण्यासाठी झटणे हे माझे आद्य कर्तव्य आहे असे ते म्हणत. त्यांची दृष्टी खरोखरच पारदर्शी होती. प्राचीन भारताचे जे जे गौरवमय आहे त्यांच्याशी वर्तमान युगातील चांगल्या गोष्टी स्वाभाविक रूपाने एकत्र केल्यानंतरच आदर्श नवभारत निर्माण होईल असा दृष्टिकोन त्यांना या संशोधनाने लाभला होता . इंग्लंडला शिक्षण घेत असताना पंजाबराव यांनी तेथील राजकीय, सामाजिक , शैक्षणिक , सांस्कृतिक आणि कृषी क्षेत्रांचा सूक्ष्म अभ्यास केला होता. ज्याव्दारे त्यांचे असे मत बनले होते की समता, स्वतंत्रता व उत्साहपूर्ण कर्मप्रवणता हयाबाबत तुम्ही खरे पाश्चिमात्य व्हा, धर्मनिष्ठ व सदाचार ह्यात खरेखुरे भारतीय व्हा. पाश्चात्य विज्ञानाने आपली आर्थिक व सामाजिक उन्नती करून घ्या असाच त्यांचा दृष्टिकोन बनलेला दिसून येतो. भारतात परतले तेव्हा समाजात शैक्षणिक जागरूकता आणण्यासाठी त्यांनी 1932 साली श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करून विदर्भात विद्या दानास प्रारंभ केला. खरे तर ते कृषी संस्कृतीचे उपासक आणि कृषी क्रांतीचे प्रणेते होते त्यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीचा ध्यास घेतला होता. भारताचे कृषिमंत्री म्हणून कार्य करीत असताना त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताच्या तसेच प्रेरणादायीअनेक योजना राबविल्या. शेतकऱ्यांना संघटित करून 'भारत कृषक समाज' ची स्थापना केली. उपेक्षित घटकांच्या व्यथा राष्ट्रीय पातळीवर मांडण्यास प्रभावी व्यासपीठ असावे या दृष्टीने ही संघटना स्थापन केली होती. त्यांनी शासनाला व समाजाला शेतकऱ्यांचा विचार करायला शिकविले. समाजाला केवळ विचार देऊनच ते थांबले नाही तर ते प्रत्यक्षात आणण्यासाठी आयुष्यभर झटले. त्यांचे कार्य, त्यांचे विचार, यांची दिशा किती योग्य होती हे विशेषतः 1951 ते 1962 ह्या दहा वर्षाच्या कालखंडात डॉक्टर पंजाबराव यांनी कृषी मंत्री म्हणून केलेल्या कार्य यातून दिसून येते. त्यांचे हे कार्य भारताला आधुनिकतेकडे नेण्यास महत्वपूर्ण ठरलेले दिसून येते. कृषी मंत्री म्हणून त्यांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याचा आढावा या शोधनिबंधाच्या माध्यमातून घेण्यात आलेला आहे.

**बीज शब्द:** डॉ. पंजाबराव देशमुख, भाऊसाहेब, कृषी, कृषक, शेतकरी, भारत.

## 1. प्रस्तावना :

विदर्भात शैक्षणिक समस्या बरोबर शेतीची समस्या तीव्र होती. डॉ. भाऊसाहेबांचा जन्म शेतकरी कुटुंबात झालेला असल्यामुळे शेतकऱ्यांची दयनीय अवस्था त्यांना माहिती होती. शेतकरी जगला पाहिजे. शेतीचे प्रश्न सुटले पाहिजेत यासाठी डॉ. पंजाबराव यांनी पुढाकार घेतला. माझा शेतकरी विज्ञानवादी कसा होईल ? इतर देशातील शेतकऱ्यांशी तो बरोबरी केव्हा करू शकेल हयासाठी डॉक्टर भाऊसाहेब सतत प्रयत्नशील असत. देशाच्या संपूर्ण विकासाचा पाया शेती हाच आहे. शेतीची म्हणजे धनधान्याची समृद्धी नव्हे तर भारताच्या अर्थकारण्याची, औद्योगिक जीवनाची किंबहुना संपूर्ण समाजाच्या जीवनाची बैठक कृषी विकासावर अवलंबून आहे हे गृहीत धरून विद्यालयात व महाविद्यालयात कृषीशिक्षण व्यापक प्रमाणात दिले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. याच उद्देश्याने त्यांच्या शिवाजी शिक्षण संस्थेने 1925 मध्ये निर्माण केलेली बहुउद्देशीय शाळा ही विदर्भातील पहिली कृषी शाळा होय. 1927 मध्ये त्यांनी "शेतकरी संघ" स्थापन केला. शेतकरी संघ हा सर्व जाती जमातिच्या शेतकऱ्यांसाठी आहे, विशिष्ट जातीपुरता मर्यादित नाही अशी भूमिका त्यांनी मांडली. शेतकरी संघाची स्थापना पंजाबरावांच्या दूरदृष्टीचे महत्वाचे पाऊल होते.

तर 1956 साली श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाची केलेली स्थापना हे देखील शेतकरी हिताच्या दृष्टीने उचलले महत्त्वाचे पाऊल होय.

भारताची सर्वांगीण प्रगती साधावयाची असेल तर शेती व्यवसायाला शिलकी उत्पादन क्षमता असलेला व्यवसाय बनविण्याचे विविध मार्ग शोधून त्याची तत्परतेने अंमलबजावणी केल्याशिवाय कृषीप्रधान भारताला तरणोपाय नाही हे डॉक्टर पंजाबरावांनी अचूक

हेरले होते. त्या दृष्टीने कृषी मंत्री असतांना त्यांनी केलेले कार्य भारताच्या अन्नधान्य उत्पादनाच्या वाढी बरोबरच शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्यास प्रोत्साहन देणारे होते.

**2. भारताचे कृषी मंत्री असतांनाचे कार्य**

1952 ते 1962 या काळात डॉ पंजाबराव देशमुख उपाख्य भाऊसाहेब भारताचे कृषी मंत्री होते. भारताला अन्नधान्यदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवायचे हे उद्दिष्ट त्यांनी समोर ठेवले होते. त्यानुसार भारतीय कृषी प्रश्नांचा सखोल विचार करून शेतकऱ्यांच्या विकासासाठी कोणत्या योजना राबविता येतील, कृषी क्षेत्रात कोणते संशोधन करता येईल याकडे त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले व त्या दृष्टीने अनेक उपक्रम त्यांनी हाती घेतले. शेती उत्पादनात वाढ करण्याच्या उद्देशाने त्यांनी पुढील उपाययोजना केल्यात .

**जपानी भात शेती पद्धती**

बहुसंख्य भारतीयांचे खाद्य असलेले धान्य म्हणजे तांदूळ. या तांदुळाच्या उत्पादनात वाढ करण्याच्या उद्देशाने जपानी भात शेतीची पद्धत त्यांना उपयुक्त वाटली . 10 जानेवारी 1953 ला डॉ. पंजाबराव यांनी भारतीय आकाशवाणी वरून भारतीय शेतकऱ्यांना या अभिनव प्रयोगासंबंधी माहिती सांगून भात शेती करणाऱ्यांनी या पद्धतीने शेती करावी असे आवाहन केले . केवळ घोषणा करून ते थांबले नाही तर भारत सरकार, राज्य सरकारे व गांधी स्मारक निधीचे विश्वस्त यांच्या सहकार्याने त्यांनी जपानी पद्धतीच्या भातशेतीच्या प्रचाराचे एक प्रचंड आंदोलन सुरू केले . तंज्ञाशी सल्ला मसलत करून विस्तृत योजना आखून कार्यास प्रारंभ केला. या आंदोलनाच्या कक्षा विस्तारीत गेल्या तसतसे विरोधकही निर्माण झाले. जपानी भातशेती हे परदेशी नाव आहे, ही पद्धत महागडी आहे , या पद्धतीच्या अवलंबाकरिता भरपूर पाणी पाहिजे, सर्वच ठिकाणी या पद्धतीचा प्रयोग करता येत नाही. अश्याप्रकारे अनेक प्रश्न या पध्दतीच्या संदर्भात विचारले जावू लागले. परंतु आपल्या कार्यातून सगळ्या विरोधकांना भाऊसाहेबांनी निशब्द केले. सर्व गोष्टी अगदी स्पष्ट शब्दात जनतेसमोर मांडल्या. ज्यांना मुबलक पाणीपुरवठा मिळवण्याची खात्री असेल त्यांनीच या पद्धतीचा अवलंब करावा असे त्यांनी स्पष्टपणे बजावले होते.

24 जानेवारी 1954 मध्ये त्यांनी पुन्हा एकदा सर्व राजकीय कृषी मंत्राची एक परिषद घेऊन ही योजना प्रत्येक राज्यातील खेडोपाडी म्हणजेच गावागावात जलदगतीने पोहोचविण्यासाठी प्रयत्नाची परकाष्टा करावी अशी आग्रहाची सूचना केली. भारत सरकारनेही या कामी सर्व प्रकारचे सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. बहुतेक राज्य कृषी विभागांनी व विशेषतः मुंबई कृषी खात्याने अत्यंत उत्साहाने या कार्यास उचलून धरले अल्पावधीतच अभिमानास्पद प्रगती घडून आली. भारतात एकूण 19,087 प्रात्यक्षिक प्रयोग क्षेत्रे प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतात निर्माण केल्या गेलीत. जपानी पद्धतीने भात शेती कशी करावी याचे प्रशिक्षण देणारे 634 प्रशिक्षण केंद्रे उघडल्या गेली. तसेच या सर्वांचा प्रचार करण्यासाठी 21,548 प्रचार सभा भरविल्या गेल्या. हस्तपत्रके, भिंती पत्रके, आकाशवाणी व चलचित्रपट इत्यादी द्वारा प्रचार करण्यात आला. सरकारी, निमसरकारी अधिकारी व कार्यकर्ते तसेच संघटना यांच्यामार्फत शेतकऱ्यांपर्यंत सर्वदूर प्रचार होऊ लागला. त्यांनी स्वतः ठिकठिकाणी जाऊन या पद्धतीची माहिती शेतकऱ्यांना करून दिली.

जपानी पद्धतीने भात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारने सर्व प्रकारे प्रोत्साहन दिले, सहाय्य दिले, खते, बी-बियाणे, कोळपी वगैरे तगाईच्या स्वरूपात पुरविण्याची योजना सरकारने सुरू केली. कोट्यावधी रुपयांची तकावी कर्जे देण्याची व्यवस्था केली. त्यामुळे भात पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला.

जपानी पद्धतीचा देशव्यापी मोहिमेमुळे भात शेतीच्या लागवडीत सुधारणा होऊन भाताचे दर एकरी उत्पादन वाढले त्याचे प्रत्यंतर इ. सन 1959 मध्ये दिसून आले. या अभिनव प्रयोगाच्या प्रचंड यशामुळे साऱ्या जगाचे लक्ष भारताने आपल्याकडे वेधून घेतले. या यशस्वी प्रयोगामुळे डॉक्टर पंजाबराव देशमुख हे तांदूळ उत्पादनाच्या प्रश्नाचे तज्ञ म्हणून साऱ्या जगात ओळखले जाऊ लागले.

**इतर पिकाच्या उत्पादन वृद्धीसंबंधीचे प्रयत्न**

डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी तांदुळाच्या उत्पादन वृद्धीकरिता जितक्या तत्परतेने प्रयत्न केले तितक्याच तत्परतेने त्यांनी गहू, ज्वारी, कापूस, जूट, काजू, भुईमूंग इत्यादी पिकांचेही उत्पादन कसे वाढेल याकडे लक्ष दिले . या पिकांच्या सर्वांगीण प्रगतीकरिता तज्ञांच्या समित्या नेमल्या. त्यांची चर्चा व अधिवेशने यांचे आयोजन केले . एवढेच नव्हे तर पिकांचे उत्पादन करणारे शेतकरी व त्या विषयातील तज्ञ यांना एकत्र आणून त्यांना विचार व अनुभव यांची संधी प्राप्त करून दिली. इतकेच नव्हे तर प्रत्येक पिकाकरिता एक राष्ट्रीय संशोधन संस्था निर्माण करून या संस्थांतील संशोधने प्रत्यक्ष शेतावर राबवणाऱ्या शेतकऱ्यांपर्यंत जाऊन पोहोचतील अशी यंत्रणा त्यांनी राबविली .

**कृषी नियतकालिक पत्रे**

शेतकऱ्यांना देशभरात शेती क्षेत्रात होणाऱ्या घडामोडींची माहिती देण्याकरीता कृषी नियतकालिक काढण्यात आले. दरमहा कृषी मंत्रालयाद्वारा सर्क्युलर लेटर्स प्रकाशित करावयास सुरुवात केली. यातून भारतातील कोणत्याही भागात शेतीसंबंधी केल्या

गेलेल्या प्रयोगाची सविस्तर माहिती प्रकाशित केली जात असे. सोबतच सरकार शेतकऱ्यांसाठी काय काय करीत आहे हेही लोकांसमोर येत असे .

**भारत कृषक समाजाची स्थापना (7 फेब्रुवारी 1955)**

सहकार व संघटन याचे महत्व डॉ. पंजाबराव देशमुख यांनी ओळखले होते. भारतीय कृषी संघटनेची आवश्यकता प्रतिपादन करताना ते म्हणतात भारतीय कृषी व कृषक याबद्दल मला नितांत आदर वाटतो मी शेतकऱ्याला सर्वश्रेष्ठ धन निर्माता समजतो. भारतीय कृषकांनी सुद्धा या लोकशाहीच्या व संघटनांच्या युगात आपली अभेद संघटना निर्माण करून सांघिक शक्तीने आपले प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मिल मालक, व्यापारी, जिनिंग फॅक्टरीचे मालक, किराणा व्यापारी यांच्याही संघटना आहे ते आपल्या संघटनाच्या बळावर आपल्या मागण्या पूर्ण करून घेऊ शकतात शेतकरी मात्र या घटनांवरून काहीच शिकू शकला नाही हे त्यांच्या अगतिकत्वाचे प्रत्यंतर आहे.
कृषी क्षेत्रात धान्य उत्पादकांच्या विविध संघटना, संशोधन, विस्तार कार्य व प्रायोगिक प्रात्यक्षिके यांची गरज त्यांनी सांगितली होती. त्याचाच परिणाम म्हणजे 7 फेब्रुवारी 1955 ला भारत कृषक समाजाची स्थापना होय.

**3. भारत कृषक समाजाची उद्दिष्टे :**

1. शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक इत्यादी प्रश्नाचे अध्ययन करणे.
2. सरकार व इतर संस्थांच्या सहकार्याने शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्याचे शिक्षण देणे.
3. कृषी विषयक उपयुक्त अशा नवनवीन प्रयोगाची माहिती करून देणे.
4. सर्व कृषकांच्या कल्याणार्थ राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर कृषी विषयक धोरण आखणे.
5. कृषी विषयक प्रदर्शनी, चर्चासत्र, संमेलने व समारंभ आयोजित करणे.
6. भारतातील विविध राज्यातील तसेच परदेशातील शेतकऱ्यांना परस्पर भेटीगाठीची सुसंधी प्राप्त करून देऊन त्यांच्यात परस्परा बद्दल सहृदय भाव व समजूतदारपणा निर्माण करणे.

ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून भारत कृषक समाजाने अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थेची स्थापना केली.
1) राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघ. (2 आक्टोंबर 1958)
2) कृषक सहकारी अधिकोष. (22 नोव्हेंबर 1960)
3) आफ्रो-आशियन ग्रामीण पुनर्रचना संघटना. ( 31 मार्च 1962 )

अनेक योजना भारत कृषक समाजाने हाती घेतल्या. उत्पादक, उपभोक्ता, सहकारी संघ, बी -बियाणे, खते, कृमीनाशक औषधे, पेट्रोल, तेल आदींचा पुरवठा करणाऱ्या कृषी संस्था, कृषी अवजारे, पशुकरिता चारा व इतर आनुषंगिक साहित्य याची गरज भागविण्याकरिता कृषकांद्वारा चालविला जाणाऱ्या उद्योग प्रतिष्ठान यांची स्थापना. प्रमुख पिकांच्या विकासासाठी पीक समित्यांची स्थापना. कापूस, जूट, तंबाखू, लोकर, चामडी, मसाले इत्यादी पदार्थांची विक्री, प्रतवारी व संस्करण याबाबत शेतकऱ्यांना मदत व्हावी म्हणून विशाल प्रमाणावर सहकारी समित्यांची स्थापना. कृषी वार्षिकांक, नियतकालिक पत्रिका व आवश्यक प्रसिद्धी पत्रके यांचे प्रकाशन. कृषकांच्या जीवन विमाचे कार्य, दिल्ली जवळ 'मितरो' या ठिकाणी कृषी अनुसंधान शाळा व दिल्लीमध्ये कृषी संग्रहालय यांची स्थापना इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण योजना भारत कृषक समाजाने धडाडीने कार्यान्वित केल्या.

भारतीय कृषकांची कर्तबगार व प्रातिनिधिक संघटना म्हणून भारत कृषी समाजाला इंडियन कौन्सिल ऑफ अग्रिकल्चर रिसर्च, इंडियन कौन्सिल ऑफ अग्रिकल्चरल एज्युकेशन, अन्न व कृषी मंत्रालय विकास योजना आयोग, इंडियन स्टँडर्ड इन्स्टिट्यूट, ऑल इंडिया रेडिओ इत्यादी संस्था वर प्रतिनिधित्व लाभले आहेत .

याबरोबरच कृषी केवळ उपजीविकेचे साधन म्हणून न राहता एक लाभदायक असा उद्योग बनावा. उत्पादकांना लाभ होईल अशा रीतीने कृषी पदार्थाची किमान किंमत निश्चित केली जावी. तकावी याव्दारा कर्ज मिळवितांना निर्माण होणाऱ्या अडचणी चे निराकरण व्हावे, सहकारी पद्धतीने शेती करावी याकरिता भारत कृषक समाज सतत प्रयत्नशील असतो.

**4. पूरक उद्योगधंदे व संघटनांची निर्मिती :**

शेतकऱ्यांनी केवळ शेतीवर अवलंबून न राहता इतर पूरक उद्योगधंदेही करावेत असे त्यांचे नेहमीच सांगणे असे त्यांनी कृषी सहाय्यक अश्या अनेक संघटना निर्माण केल्या मधमाशी पालन संघटना, लाखोकरिता अन्य संघटना, युवक कृषक समाज, राज्यीय कापूस व्यापार यंत्रणा, सहकारी पतपेढी, अखिल भारतीय सहकारी खरेदी विक्री संघटना इत्यादी उपयुक्त संघटनांची त्यांनी निर्मिती केली.

**5. कृषी सहाय्यक यंत्र संघटना :**

भारतीय शेतीचे आधुनिक पद्धतीने यांत्रिकीकरण केल्याशिवाय अधिक धान्योत्पादन होऊ शकणार नाही म्हणून शेतकऱ्यांमध्ये शेतीच्या यांत्रीकरणाबद्दल आवड निर्माण होणे आवश्यक आहे तसेच त्यांना नवनवीन उपयुक्त यंत्राची माहिती करून देण्याकरिता सन 1956 मध्ये या संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेने स्वतंत्रपणे कृषीपयोगी यंत्राची प्रदर्शने, नांगरणी स्पर्धा इ. उपक्रम सुरू केले असून भारतीय शेतकऱ्यांना मदत देण्याचे कार्य करते.

**6. कृषी प्रदर्शने :**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी मंत्री असतांना त्यांनी भरविलेली राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कृषी प्रदर्शने हे भारतीय कृषी क्षेत्राला आधुनिकतेकडे नेणारे पाऊल होते. भारतीय शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञांनाच्या किंवा यंत्राच्या माधमातून शेती करण्यास प्रोत्साहन देण्याकरिता त्यांनी आयोजित केलेली कृषी प्रदर्शने महत्वपूर्ण ठरली. 11 डिसेंबर 1959 ते 29 फेब्रुवारी 1960 या काळात दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शन भरविले होते. जवळपास 92 दिवस हे अधिवेशन चालले होते. एकूण शंभर एकर जमिनीवर हे प्रदर्शन भरविण्यात आले होते . अमेरिका, रशिया , जर्मनी, पोलंड, इराक, अफगाणिस्तान, सिलोन, ब्रह्मदेश, व्हिएतनाम, चीन, मंगोलिया व इराण या 12 देशांनी आपल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारे मंडप उभारून स्वदेशी कृषी व अन्य उद्योग विषयक प्रगतीचे टप्पे या सम्मेलनात प्रदर्शित केलेले होते. तसेच युनोची आंतरराष्ट्रीय कृषी संघटना, आंतरराष्ट्रीय कृषी उत्पादकांची संघटना यांनीही आपापले प्रदर्शन कक्ष उघडून जागतिक स्तरावर अन्न व कृषी यांच्या प्रगती करिता काय काय करता येणे शक्य आहे याचे प्रदर्शन घडविले होते. अनेक थोर परदेशी पाहुण्यांनी या प्रदर्शनाला भेटी दिल्यात. जगात चाललेल्या कृषीविषयक प्रयोगांची प्रात्यक्षिके व विविध प्रकारची कृषी यंत्रसामग्री पाहण्याची संधी या प्रदर्शनाच्या निमित्ताने भारतीय शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली.

**7. वनाचे संरक्षण व संवर्धन :**

कृषी बरोबरच वनाचे संरक्षण व संवर्धन करण्याकडेही त्यांनी लक्ष दिले वन महोत्सवासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले यात किती झाडे लावली यापेक्षा किती जगली व जगविल्या गेली याला महत्व दिले.

समुद्रकिनारपट्टीवरील जमिनीची धूप थांबविण्याकरिता काजूच्या झाडांची लागवड करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. विशिष्ट जमिनीत विशिष्ट प्रकारचे वृक्ष वाढवू शकतात दुसरीकडे ते जगू शकत नाही यावर विश्वास न ठेवता प्रत्यक्ष प्रयोग व अनुभव त्यांनी ग्राह्य मानला.

**8. शेतकऱ्यांना विविध सन्मान -पदव्या देण्याची योजना :**

शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांनी काही योजना सुरु केल्या. जसे पीक उत्पादनात विक्रम करणाऱ्यांचा गौरव करण्याकरीता विविध सन्मान-पदव्या देण्याची योजनाही आखली. तसेच सधन पण होतकरू शेतकऱ्यांना परदेशी पाठवून व तेथील कृषी कुटुंबात राहून कृषीकांची कृषी जीवन व कार्य अनुभवाण्याची संधी आंतरराष्ट्रीय कृषक विनिमय संघटनाद्वारा उपलब्ध करून दिली.

केवळ भारतीय कृषकांपुरतीच त्यांची दृष्टी मर्यादित नव्हती तर साऱ्या जगातील शेतकऱ्यांच्या हिताचा विचार ते करीत अनेकदा त्यांनी आंतरराष्ट्रीय कृषी संघटनाच्या अध्यक्षपदावरून जगातील सर्व शेतकऱ्यांनी या पृथ्वीचे सुख समाधानाने भरलेल्या नंदनवनात रुपांतर करावे असे आवाहन केले. इतकेच नव्हे तर जागतिक धान्य कोठारे स्थापन करून त्याद्वारे दुष्काळ पीडित देशांना धान्य उपलब्ध करून देऊन मानवतेची महान सेवा करण्याचे श्रेय जगातील शेतकऱ्यांनी घ्यावे असे कळकळीचे आवाहन केले. त्यांच्या ह्या विशाल व मानवतावादी दृष्टीकोनातून चा प्रत्यय आल्यामुळेच इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्स सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेत त्यांना अत्यंत मानाचे स्थान मिळाले होते.

**9. निष्कर्ष :**

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे संपूर्ण जीवन कार्य बघता कृषीचा विकास म्हणजे पर्यायाने शेतकऱ्यांचा विकास हे उद्दिष्ट समोर ठेवून शिक्षण, कृषी, सहकार व संघटन ह्या विविध क्षेत्रातून त्यांनी महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. केंद्रीय कृषिमंत्री म्हणून डॉक्टर पंजाबराव यांनी केलेली कामगिरी दीर्घकाळ पर्यंत सर्वांच्या स्मरणात राहील अशीच आहे. तांदूळाचे उत्पादन वाढविण्याकरिता त्यांनी केलेला जपानी भात शेती पद्धतीचा प्रयोग यशस्वी करून तांदूळ उत्पादनात क्रांतिकारक वाढ झाली. कृषी क्षेत्रात होणाऱ्या घडामोडीची माहिती मिळविण्याकरिता कृषी नियतकालिक सुरु करून सरकारी उपक्रमाची सविस्तर माहिती शेतकऱ्याना उपलब्ध करून दिली. त्यांनी केलेल्या अत्यंत महत्त्वाच्या दोन गोष्टी म्हणजे भारत कृषक समाजाची स्थापना व जागतिक कृषी प्रदर्शनीचे आयोजन. भारत कृषक समाजाच्या माध्यमातून भारतातील कोट्यावधी शेतकऱ्यांची सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. जागतीक कृषी प्रदर्शन भरवून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या व्दारे शेती करून शेती उत्पादन वाढविण्यास

शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. एवढेच नव्हे तर पिकांच्या राष्ट्रीय संशोधन संस्था स्थापन करून प्रत्यक्ष संशोधने शेतकऱ्यांपर्यंत नेवून पोहचविली व शेतकऱ्यांना नवनवीन उत्पादने घेण्यास प्रोत्साहन दिले.

**संदर्भ:**

1. किन्हीकर, डॉ . पुष्पा,समाज प्रवर्तक डॉक्टर पंजाबराव देशमुख , विसा बुक्स ' नागपूर मार्च 2008
2. देशमुख कल्पना . डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक योगदान ऋचा प्रकाशन नागपूर
3. सावरकर सुदाम व सूर्यकर रा.ब. डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य, श्री. रा. लोंढें ,अमरावती डिसेंबर 1964
4. प्राचार्य पवार ना , महामानव डॉक्टर पंजाबराव देशमुख , प्रकाशन पुणे 1993